# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 07/12/2022 (बुधवार) सायंकाळ


---

## घरफोडी

**पो.स्टे. अरोली** :— अंतर्गत ०५ कि. मी. अंतरावरील नांदगाव शिवार भंडारा ते रामटेक रोड येथे दि. ०५/१२/२०२२ चे २०.१५ वा. ते ०६/१२/२०२२ चे ०८.३० वा. सुमारास फिर्यादी नामे— नरेश एकनाथ बावनकुडे, वय ४६ वर्ष, रा. कोदामेंढी यांचे कृषी केंद्र दुकान असुन फिर्यादी धान खरेदी विक्री चे काम करत असुन भंडारा ते रामटेक रोडवर नांदगांव शिवारात फिर्यादीचे स्वत:चे ऑफीस असुन दिनांक ०५/१२/२०२२ रोजी रात्री ०८.१५ वा. दिवानजी भोजराज शंकर निकुळे, वय ४९ वर्ष, रा. कोदामेंढी यांनी ऑफीस बंद करून फिर्यादीचे ऑफीस ची चाबी घेवुन घरी परत गेले व नमुद घटनावेळी दिवानजी भोजराज हा ऑफिस उघडण्याकरीता गेला असता त्याला ऑफिस च्या दरवाज्याला लॉक दिसले नाही व ते लॉक खाली तुटलेल्या अवस्थेत दिसले म्हणुन दिवानजी यांनी फिर्यादीला त्याचे मोबाईलवर फोन करून वरील घटने बाबत सांगितले. फिर्यादी यांनी लगेच आफिसला जावुन पाहीले तर ऑफिस चे दाराला लावलेल्या कडी कोंडयाला लावलेला कुलुप तोडुन खाली पडलेला दिसला म्हणुन फिर्यादीने ऑफिसचे आतमध्ये जावुन पाहीले तर फिर्यादीचे ऑफिसचे टेबलचे लॉकर तुटलेले दिसले. फिर्यादीने लॉकरचे आत मध्ये ठेवलेले २०००/—रू. फिर्यादीला दिसले नाही. कोणत्यातरी अज्ञात चोरटयांने फिर्यादीचे ऑफिसचे दाराचे लॉक तोडुन २०००/—रू. चोरून नेल्याने अज्ञात चोरटयांविरूध्द गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. अरोली येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७,३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास नापोशि मनोज जयस्वाल ब. नं. १४२५ मो. नं ९९२३१४३९६२ हे करीत आहे.


**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**